# प्रथम वर्ष तांत्रिक व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम प्रवेश २०१६-१७

## चौथ्या फेरी मध्ये भाग घेण्यासाठीच्या सूचना ( दि. १५.०७.२०१६)

१. विद्यार्थ्यांनी चौथ्या फेरी मध्ये भाग घेण्यासाठी नवीन विकल्प अर्ज भरावा किंवा पूर्वीचाच विकल्प अर्ज विचारात घेण्याबाबतची कार्यवाही ऑनलाईन पद्धतीने घोषित केलेल्या कालावधी मध्ये करावी. चौथ्या फेरीमध्ये भाग घेण्यासाठी हि कार्यवाही अनिवार्य आहे.

२. या फेरीमध्ये भाग घेण्यासाठी, या पूर्वीच्या कोणत्याही फेरीमध्ये जर उमेदवाराने Freeze पर्याय निवडलेला असेल तर तोप्रवेश निश्चिती केंद्रावर स्वतः उपस्थित राहून बदलून घेणे आवश्यक आहे. त्यानंतरच असे विद्यार्थी विकल्प अर्ज सादर करू शकतील.

३. पदविका व B.Sc उमेदवार या फेरीमध्ये विकल्प अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.

४. या फेरीमध्ये महाराष्ट्र राज्यातील उमेदवारांकरिता माहिती पुस्तिकेत नियम क्रमांक ११ मध्ये नमूद केल्यानुसार जागा वाटप करण्यात येईल [11(d) For the CAP Round-IV, the Stage-I to IX of rule 10 of these rules shall be executed]

५. उमेदवार जरी TFWS असला तरी त्याला TFWS व्यतिरिक्त इतर किंवा अल्पसंख्यांक प्रवर्गाचा असला तरी त्याला बिगर अल्पसंख्यांक संस्थांमधील Choice Code निवडता येतील.

६. चौथ्या फेरीमध्ये भाग घेतल्यानंतर उमेदवारास जर वरीलप्राधान्यक्रमाचे जागावाटप झाले तरच त्याचा पूर्वी वाटप करण्यात आलेला प्रवेश रद्द होतो परंतु जर नवीन जागावाटप झाले नाही तर त्याचा पूर्वीचा प्रवेश अबाधित राहतो.

७. या फेरीपूर्वी विविध संस्था/अभ्यासक्रमांमध्ये उपलब्ध असलेल्या रिक्त जागांची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. विकल्प अर्ज भरतेवेळी या जागांची माहिती घ्यावी तथापि हि फेरी dynamic पद्धतीने घेतली जाणार असल्याने ज्या अभ्यासक्रमासाठी जागा उपलब्ध नाहीत अशा अभ्यासक्रमांचासुद्धा विकल्प अर्जामध्ये समावेश करावा कारण या फेरीमध्ये वेगवेगळ्या टप्प्यावर जागा रिक्त होत असतात व त्या जागेसाठी गुणक्तेनुसार पात्र उमेदवारांना वाटप करण्यात येतात. उमेदवारांनी रिक्त जागांचाच विचार न करता त्यांना पाहिजे असलेल्या अभ्यासक्रम / संस्था यांची यादी तयार करून व त्यांचा गुणवत्ता क्रमांक विचारात घेऊन विकल्प अर्ज भरावा व निश्चित करावा.

८. ज्या उमेदवारांचे नाव महाराष्ट्र राज्य / अखिल भारतीय / अल्पसंख्यांक गुणवत्ता यादी मध्ये आहे, अशा उमेदवारांना विकल्प अर्ज भरता येईल, परंतु Freeze पर्याय निवडलेल्या उमेदवारांना या फेरीमध्ये भाग घेण्यासाठी प्रवेश निश्चिती केंद्राकडे जाऊन Un-Freeze करून घेणे आवश्यक आहे.

९. ज्या विद्यार्थ्यांना या पूर्वीच्या कॅप-१, कॅप-२ आणि / किंवा कॅप-३ फेरीमध्ये प्रवेश निश्चित झालेले होते व त्यांना कॅप-४ मध्ये वरील प्राधान्याच्या क्रमांकावर (Betterment ) जागावाटप झालेले आहे / नाही त्यांनी प्रवेश निश्चिती केंद्रावर जाण्याची आवश्यकता नाही.

१०. ज्या विद्यार्थ्यांनी पहिल्या/ दुसऱ्या/ तिसऱ्या फेरीमधील प्रवेश निश्चित केलेला आहे आणि चौथ्या फेरीमध्ये भाग घेतलेला आहे व त्यांना चौथ्या फेरीमध्ये जागावाटप (Betterment) झालेले नाही तर त्यांचा पूर्वी मिळालेला (कॅप फेरी-१ / कॅप फेरी-२ / कॅप फेरी-३ या पैकी अंतिम असा) प्रवेश अबाधित राहतो.

११. या फेरीमधील जागावाटप हे अंतिम असल्यामुळे त्यानंतर उमेदवारांनी संबंधित संस्थेमध्ये विहित कालावधीमध्ये जाऊन उर्वरित आवश्यक शुल्क भरून व आवश्यक कागदपत्रे सादर करून प्रवेशाची सर्व कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक आहे.

१२. ज्या उमेदवारांनी यापूर्वीच्या फेरीमध्ये Float / Slide असा पर्याय निवडलेला आहे व ज्यांना चौथ्या फेरीमध्ये भाग घ्यावयाचा नाही , अशा विद्यार्थ्यांनी चौथ्या फेरीसाठीचा विकल्प अर्ज भरू नये. अश्या उमेदवारांचा पूर्वी मिळालेला (कॅप फेरी-१ / कॅप फेरी-२ / कॅप फेरी-३ या पैकी अंतिम असा) प्रवेश अबाधित राहतो.

१३. ज्या विद्यार्थ्यांना या फेरीमध्ये प्रथमच जागेचे वाटप झालेले असेल त्यांनी प्रवेश निश्चिती केंद्रावर जाऊन प्रवेश निश्चिती करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना आवश्यक रकमेचा डी.डी. सादर करणे व सर्व मूळ कागदपत्रे तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश निश्चिती केंद्रावर कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर व विद्यार्थी पात्रता निकष पूर्ण करत असल्याची खात्री करून घेऊन अधिकारी ऑनलाईन प्रवेश निश्चिती करून त्याची पोच पावती देतील. हि पावती विद्यार्थ्याने सांभाळून ठेवावी.
अशा प्रकारे प्रवेश निश्चिती केली नाही तर अशा विद्यार्थ्यांचा या फेरीतील प्रवेश रद्द होतो.

१४. प्रवेश निश्चितीसाठी डी डी रु. ५०००/- (एस सी /एस टी वगळून इतर सर्व प्रवर्गासाठी) व रु. १०००/- (एस सी / एस टी साठी) जमा करणे आवश्यक आहे. डी डी “Commissioner, State CET Cell, Maharashtra State, Mumbai”यांचे नावाने Payable at “Mumbai” असा काढलेला असावा.

---x---